महाराष्ट्र शासन
कृषी विभाग
कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,
साखर संकुल इमारत, तळमजला, शिवाजीनगर, पुणे-४११००५
दुरध्वनी क्र .०२०/२५५१२८१३ Email ID :- estt4b@gmail.com

# -सूचना-

महाराष्ट्र कृषी सेवा परीक्षा २०२१ करीता महाराष्ट्र कृषी सेवा गट-ब (कनिष्ठ) संवर्गात नियुक्तीसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शिफारस केलेल्या उमेदवाराना सरळसेवेने नियुक्ती देण्यासाठी शासन अधिसूचना दि. १४ जुलै, २०२१ मधील तरतुदीनुसार नमुना-"ब" बंधपत्र" मागविण्यात येत आहेत.

महसुली विभागनिहाय संख्यात्मक रिक्त पदांची माहिती तसेच बंधपत्राचा नमुना सहपत्रित करण्यात येत आहे. संबंधित कागदपत्र तपासणी झालेल्या पात्र उमेदवारांनी नमुना-"ब" बंधपत्र बंद पाकीटात दि. २७/१२/२०२३ पर्यंत कृषी आयुक्तालयास प्रत्यक्ष व पोस्टाने विहित कार्यालयीन वेळेत पोहोचतील अशा बेताने पाठविण्यात यावी. नमुना-"ब" बंधपत्र बंद पाकीटामध्ये देण्यात यावेत. **पाकीटावर "महाराष्ट्र कृषी सेवा गट-ब (कनिष्ठ) संवर्गासाठी नमुना-"ब" बंधपत्र" असे स्पष्ट वाचनीय राहील असे ठळक अक्षरात लिहावे.** तसेच बंधपत्रामध्ये खाडाखोड नसावी. जे उमेदवार वैयक्तिक नमुना-"ब" बंधपत्र विहित वेळेत कृषी आयुक्तालयास सादर करणार नाहीत त्यांचेबाबत उक्त अधिसूचनेतील तरततूदीनुसार चक्रारकार पध्दतीने महसूल विभाग वाटपाची कार्यवाही करण्यात येईल.

शासन अधिसूचना दि. १४ जुलै, २०२१ मधील नियम ७ मधील तरतुदीनुसार खालील परिस्थितीत खालील उमेदवाराना महसूल विभाग वाटपातून सूट अनुज्ञेय आहे.

१) जे अधिकारी स्वत: दिव्यांग आहेत.

२) ज्या अधिकाऱ्यांचा जोडीदार किंवा त्याचे मूल मतिमंद आहे किंवा ज्या अधिकाऱ्यांनी मतिमंद असलेल्या स्वत:च्या भावाचे किंवा बहिणीचे पालकत्व स्वीकारलेले आहे.

३) कायदेशीर कागदपत्राव्दारे एकल पालकत्व सिध्द झालेले अधिकारी.

उपरोक्त १ ते ३ बाबत दाव्या पुष्ठ्यर्थ आवश्यक दस्ताऐवज जसे दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र, वैद्यकिय प्रमाणपत्र, ई. जोडणे आवश्यक राहील.

(ज्ञानचंद्र गित्ते)
**वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी,**
**कृषी आयुक्तालय, म. रा., पुणे**

जा.क्र. कृ.आ.पुणे/कृअ/सरळसेवा/ २०२१/ आस्था-४/ ३८४६५ /२३
कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-५. दि. १३ डिसेंबर २०२३

प्रति,

-----------------

सर्व संबंधित उमेदवार

प्रत - कक्ष अधिकारी १६-अे कृषी व पदुम विभाग मंत्रालय मुंबई-३२ यांना माहितीसाठी.

**शासन अधिसुचना- महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-अ, दिनांक - १४ जुलै, २०२१**

(सोबतचा **नमुना "ब" (बंधपत्र)** सरळसेवेने नियुक्तीसंदर्भात)

मी श्री /श्रीमती/ कुमारी ------------------------------------------ या व्दारे असे लिहून देतो /देते की, माझा महाराष्ट्र कृषी सेवा गट-ब (कनिष्ठ) संवर्गातील पदावर सरळसेवेने नियुक्तीच्या निवडसुचीत समावेश असल्याचे मला क्र. ------------ दिनांक ------------- च्या पत्रांन्वये कळविले आहे. सदर पदांस महाराष्ट्र कृषि सेवा गट-ब(क) पदांवर सरळसेवेने नियुक्तीसाठी विभागीय संवर्ग संरचना व विभागीय संवर्ग वाटप याबाबत नियमावली, दि. १४.०७.२०२१ पासुन लागु असून माझी -------------- या पदावर सरळसेवेने नियुक्ती झाल्यावर या नियमातील तरतुदी मला लागु होणार आहेत. सदर नियमावलीतील नियम-७ मधील तरतुदीन्वये लागु असलेली खालील माहिती सादर करीत आहे.

१) स्वत: दिव्यांग कर्मचारी (होय/नाही) (दिव्यांगत्वाचे संगणीकृत प्रमाणपत्र क्र. ---------- जोडणे आवश्यक)

२) जोडीदार किंवा त्याचे मुल मतिमंद आहे किंवा मतिमंद असलेल्या स्वत:च्या भाऊ किंवा बहिणीचे पालकत्व स्विकारलेले आहे. ------------(होय/नाही). (आवश्यक दस्तऐवज सांक्षाकित करून जोडणे आवश्यक राहील.)

३) कायदेशीर कागदपत्राव्दारे एकल पालकत्व सिध्द झालेले अधिकारी. (आवश्यक दस्तऐवज सांक्षाकित करून जोडणे आवश्यक राहील.)

सदर नियमावलीतील तरतुदीच्या अनुषंगाने मी **महाराष्ट्र कृषी सेवा गट-ब (कनिष्ठ) कृषी अधिकारी** या पदावर सरळसेवेने नियुक्तीसाठी माझा पहिला पसंतीक्रम # ------------------ या महसुल विभागात सेवा करणेसाठी देत आहे.

ठिकाण :-

दिनांक :-

आपला /आपली विश्वासू

स्वाक्षरी ----------------------------

संपुर्ण नाव -------------------------

पत्रव्यवहाराचा पत्ता ---------------

-----------------------------------

स्वजिल्हा -----------------------

# १) नागपुर २) अमरावती ३) औरंगाबाद ४) कोकण-१ ५) नाशिक ६) कोकण-२ ७) पुणे, यापैकी कोणताही एक महसुल विभाग नमुद करावा.

शासन अधिसूचना दि.१४.०७.२०२१ नूसार महाराष्ट्र कृषी सेवा गट-ब[कनिष्ठ] मंजूर, भरलेली व रिक्त पदांचा महसुली विभागनिहाय तपशील

(माहे नोव्हेंबर, २०२३ अखेर)

| अ.क्र | महसुल विभाग | मंजुर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | % |
|---|---|---|---|---|---|
| १ | कोकण-१ विभाग | १०५ | ७२ | ३३ | ३१.४३ |
| २ | कोकण-२ विभाग | ७७ | ४३ | ३४ | ४४.१६ |
| ३ | नाशिक विभाग | २८२ | १८८ | ९४ | ३३.३३ |
| ४ | पुणे विभाग | ३९२ | २९९ | ९३ | २३.७२ |
| ५ | औरंगाबाद विभाग | ३८९ | २३८ | १५१ | ३८.८२ |
| ६ | अमरावती विभाग | २८४ | १८५ | ९९ | ३४.८६ |
| ७ | नागपुर विभाग | २३५ | १३८ | ९७ | ४१.२८ |
| **एकुण** | | **१७६४** | **११६३** | **६०१** | **३४.०७** |

(ज्ञानचंद्र गित्ते)
वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी
कृषी आयुक्तालय, म. रा., पुणे